**नियमित दिवाणी दावा क्र.३/२०१९**
**निशाणी क्र. ५१**

**वादीतर्फे सा.क्र.३ यांची साक्ष**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** **:-** नंदलाल सजन नेरे
**वय** **:-** **४६** वर्षे
**कामधंदा** **:-** **नोकरी,** शिरस्तेदार उप अधिक्षक भूमि अभिलेख धुळे
**रा.** **:-** नाशिक

**शपथेवर सरतपास वादीतर्फे वकील श्री.एस.एम.शिंदे यांचेमार्फत**

मी निफाड येथे ०२ मे २०१६ ते २० मार्च २०२० पर्यंत भूमापक म्हणून कार्यरत होतो. मोरनं ५०५५/२०१६ कामी उत्तम माधव भंडारी यांनी केलेला अर्ज सोबत आणला आहे. सदर अर्जात गट नं.८६९ च्या मोजणीबाबतचा उल्लेख आहे. त्या गटाव्यतिरिक्त इतर कोणत्याही गटाच्या मोजणीबाबतचा उल्लेख प्रस्तुत अर्जात नमूद नाही. अर्जदाराने केवळ गट नं.८६९ च्या मोजणीकामी फी भरली. अर्जाप्रमाणे मी गट नं.८६९ ची मोजणी केली. या मोजणी संबंधी नकाशाच्या अ व ब प्रती मी सोबत आणलेल्या आहेत. नकाशाच्या अ व ब प्रतमध्ये देखील गट नं.८६९ चा मोजणी नकाशा आहे. आता मला अभिलेखावर दाखल मोरनं.५०५५/२०१६ च्या क प्रत नकाशाची छायांकित प्रत दाखविण्यात आली. ती छायांकित प्रत मी माझ्या सोबत आणलेल्या मोरनं.५०५५/२०१६ च्या अ व ब शिटप्रमाणे बरोबर आहे. त्यावर भूकरमापक म्हणून माझी सही आहे.

२. (त्यास वादीच्या विधिज्ञांनी निशाणी देण्यास विनंती केली असता प्रतिवादीचे विधिज्ञांनी प्रस्तुत क प्रत ही छायांकित (झेरॉक्स) असल्याने त्यास निशाणी देण्यास हरकत घेतली. त्यास उत्तर देतांना वादीच्या विधिज्ञांनी दाखल छायांकित प्रत ही साक्षीदाराने त्याच्या सोबत आणलेल्या अ व ब शीट प्रमाणे बरोबर असल्याचे सांगितल्याने त्यास निशाणी देण्यास विनंती केली. साक्षीदार याने कोर्ट समन्स प्रमाणे स्वत:सोबत मोरनं.५०५५/२०१६ नकाशाची अ व ब प्रत सोबत आणलेली आहे त्याने अभिलेखावर दाखल छायांकित नकाशाची क प्रत ही त्याच्या जवळील

अ व ब शीट नुसार असल्याचे तसेच त्याच्या माहितीप्रमाणे बरोबर असल्याचे कथन करत त्यावर त्याची सही असल्याचे देखील कथन केलेले असल्याने नकाशाबाबतचा मजकुर सिध्द होतो.) करिता त्यास निशाणी क्र. ५२ देण्यात येतो.

सरतपास संपला.

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री.आर.बी.कोल्हे यांच्यामार्फत**

**३.** हे म्हणणे खरे आहे की, ७/१२ उता-यानुसार कसबेसुकेणे येथील गट नं.८६९ हा प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या मालकीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, रेकॉर्ड वरील उता-यात प्रतिवादी क्र.१ व २ व्यतिरिक्त इतर कोणाचीही नावे लागलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या गट नं.८६९ च्या पश्चिम व उत्तरेला वादींची मिळकत गट नं.८६८ आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडील नकाशानुसार प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या गट नं.८६९ व वादीच्या गट नं.८६८ च्या दरम्यान पूर्व पश्चिम व उत्तर दक्षिण बांध होता.

**४.** हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्यांच्या गट नं.८६९ च्या मोजणीकामी आमच्या कार्यालयात अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या मोजणीला मोरनं.५०५५/२०१६ असा नंबर पडला. हे म्हणणे खरे आहे की, त्या मोजणीचा अर्ज मी आज माझ्याकडील दस्तांसोबत आणलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की,अर्जदाराच्या अर्जात त्यांच्या गट नं.८६९ च्या पश्चिम व उत्तरेला गट नं.८६८ नमूद आहे.

**५.** हे म्हणणे खरे आहे की, सर्वे मॅन्युअलनुसार ज्या गटाची मोजणी करायची आहे त्याच्या लगत कब्जेधारकांची गटांची मोजणी देखील केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, मी गट नं.८६९ ची मोजणी करतांना लगत मोजणीधारकांच्या गटाची मोजणी देखील केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याप्रमाणे मोजणी

नकाशा तयार करतात. हे म्हणणे खरे आहे की, मी दि.०७.०९.२०१६ प्रत्यक्ष जागेवर जावून मोजणी केली. हे म्हणणे खरे आहे की, दि.१५.०९.२०१६ रोजी प्रत्यक्ष जागेवर जावून हद्दी खुणा दाखविल्या. हे म्हणणे खरे आहे की, मोरनं.५०५५/२०१६ च्या नकाशानुसार गट नं.८६८ चे मालक वादी यांनी प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या गट नं.८६९ मध्ये १४ आर क्षेत्राचे अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाले. हे म्हणणे खरे आहे की, ही अतिक्रमणाबाबतची बाब नकाशात निळया रंगाने दर्शविलेली आहे.

**६.** हे म्हणणे खरे आहे की, मी गट नं.८६९ ची मोजणी करत असतांना गट नं.८६८ ची मोजणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी व हद्दी खुणा दर्शविण्यापूर्वी मी कार्यालयामार्फत वादी, प्रतिवादी व लगत कब्जेधारकांना नोटीसा पाठविल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, त्यानुसार वादी, प्रतिवादी व लगत कब्जेधारक मोजणी व हद्दी खुणा दर्शवितेवेळी प्रत्यक्ष जागेवर हजर होते. हे म्हणणे खरे आहे की, मी केलेली मोजणी ही सर्वे मॅन्युअलप्रमाणे केलेली असून योग्य व कायदेशीर आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

दिनांक : २१/०४/२०२६
ठिकाण : पिंपळगाव (ब)

(व्ही.डब्ल्यू. खेंदाड)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पिंपळगाव (ब) ता.निफाड, जि. नाशिक